झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-२/ ८९१ /२०२२
दिनांक :-०८/०९/२०२२.

झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश
(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता "उपरोक्त अधिनियम" असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेचे नियोजन आहे.

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली ही मिळकत घोषित नसल्याचे दिसून येते. तथापि, मा.महापालिका तथापि,उप आयुक्त, परिमंडळ क्र. १ पुणे महानगरपालिका पुणे यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.उप-१/१७८८, दि.१३/०७/२०२० अन्वये सदर ठिकाणी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे सादर केला आहे. तसेच सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रत्यक्ष जागेवर दि.१६/०६/२०२२ रोजी स्थळपहाणी करण्यात आली आहे. त्याबाबतचा अहवाल सोबत अवलोकनार्थ सादर केला असून सदर ठिकाणी झोपडपट्टी सदृष्य परिस्थीती आढळून आली आहे. तसेच नगरभुमापन कार्यालय (२) पुणे यांचेकडील दि.०२.०१.२०२१ रोजीच्या मोजणी नकाशानुसार त्रिकोणमिती पध्दतीने येणारे ४०००.०० चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.१२/०७/२०२२ रोजीची पूर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र जुले २१-२७, २०२२ पृष्ठ क्र. ०३ व ०४

वर तसेच सांजमहानगरी व लोकमान्य सांजवार्ता या दैनिक वृत्तपत्रात दि.२२/०७/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.१५/०७/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; तसेच सदर नोटीशीची प्रत जागा मालक महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे व सदरची प्रत मा. आयुक्त, महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना देखील देणेत आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर जागेचे मालकी असलेले महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था यांनी दि.१०/०८/२०२२ रोजी पत्र सादर केले असून लेखी म्हणणे सादर करणेकरीता दि.३०/०८/२०२२ पर्यंत मुदत मिळणेची विनंती केली. त्यानुसार या कार्यालयाने सदर प्रकरणी दि.३०/०८/२०२२ पर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही.

तथापी, तद्‌नंतर महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था यांचेकडून दि.२५/०८/२०२२ रोजीचे पत्र या कार्यालयास दि.३०/०८/२०२२ रोजी प्राप्त झाले असून त्यामध्ये विषयांकित मिळकतीची परिपूर्ण माहिती या संस्थेमार्फत शासन स्तरावर करण्यात आलेली आहे. शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून काही दिवसांत शासनाकडून निर्देश अपेक्षित आहे. तरी विषयांकित मिळकतीवरील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची कार्यवाही स्थगित करण्याची विनंती केली आहे. तथापि, सदर मिलकतीवरील ७० टक्केहुन अधिक झोपडीधारकांची संमती विकसकास असल्याने उक्त मिळकतीवरील क्षेत्रावर महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ नुसार झोपुप्रा योजना राबविणेकामी पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच या शासकीय जमिनीच्या अधिमुल्याच्या २५ टक्केपैकी १० टक्के रक्कम देखील विकसक यांनी नियमानुसार अदा केलेली आहे. त्यानुषंगाने या कार्यालयामार्फत महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था यांना दि.०७/०९/२०२२ रोजी रितसर लेखी पत्रान्वये अलहिदा उत्तर देण्यात आलेले आहे. त्यामुळे याप्रकरणी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ कलम ३क नुसार पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण

समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

महानगरपालिकेचे नाव :- पुणे महानगरपालिका
झोपडपट्टीचे नाव :- स.नं.९४/१३अ/१, सि.स.नं.२८८१/१, आरोग्य भवन, येरवडा, पुणे

| गाव | फा.प्लॉ.क्र /सि. स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र ( चौ. मी.) पूर्णत: | चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मौजे येरवडा | स.नं.९४/१३अ/१, सि.स.नं.२८८१/१ | शासकीय (महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था) | ४०००.०० चौ.मी. | पुर्वेस - न.भू.क्र. २८८५ ते २८८९ पैकी व लागू रस्ता | |
| | | | | पश्चिमेस - स.नं.९४ पैकी व न.भू.क्र. २८८१ पैकी व न.भू.क्र. २८९० | |
| | | | | दक्षिणेस - स.नं.९४ पैकी व न.भू.क्र. २८८१ पैकी | |
| | | | | उत्तरेस - स.नं.९४ पैकी व न.भू.क्र. २८८१ पैकी व न.भू.क्र. २८८४ पैकी | |

सदरची नोटीस ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

OU

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

८.९.२०२२

(राजेंद्र निंबाळकर) भा.प्र.से
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- ०८ / ०९ /२०२२

प्रत-

१. जमीन मालक महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, ससून सर्वोपचार रुग्नालय परिसर, पुणे ,४११००१ - यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.
२. मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीस्तव सादर.
३. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव सादर.

13.9.22